International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# नाशिक जिल्ह्यातील भूमिहीन महादेव कोळी जमातीच्या उपजीविकेचा समाजशास्त्रीय अभ्यास

**दत्तात्रय विठ्ठल गांगोडे**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख, एल्फिस्टन महाविद्यालय, मुंबई*
*Corresponding Author - दत्तात्रय विठ्ठल गांगोडे*
DOI - 10.5281/zenodo.10951969

**प्रस्तावना (Introduction):**

प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्हयातील भूमिहीन आदिवासी महादेव कोळी लोकांची भूमिहीनता आणि त्याचा उपजीविकेवर होणारा परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे. या आदिवासी बांधवांचा अगदी प्राचीन काळापासून इतिहास प्रवास बघितला तर तो अतिशय खडतर व आधुनिक समाजापासून दुरावलेला असल्याचे दिसून येते. या भारतभूमीला स्वातंत्र्य मिळून आज ७९ वर्षे झाली, आणि विकासाच्या प्रक्रियेत देशाने बरीच प्रगती केली आहे, परंतु येथिल आदिवासींची स्थिती मात्र फारशी बदललेली दिसत नाही. ते आजही बिगर आदिवासींच्या तुलनेत २० वर्षांनी मागासलेले जीवन जगत आहेत. नाशिक जिल्हयातील महादेव कोळी लोकांनी आपल्या परंपरा अतिशय आदरयुक्त भावनेने जोपासलेल्या आहेत. परंतु त्यांचा शैक्षणिक विकास न झाल्याने त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन फारसे बदलले दिसत नाही.

२०११ च्या जनगणनेनुसार, भारतात अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या १०.४३ कोटी आहे, जी एकूण लोकसंख्येच्या ८.६ टक्के आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतातील अनुसूचित जमातींच्या उन्नतीसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. परंतु एकात्मिक प्रयत्न आणि घटनात्मक तरतुदींमुळे अनुसूचित जमातीच्या फक्त एका लहान भागालाच फायदा झाला असून आदिवासी समाजाच्या एका मोठ्या वर्गाचे अजूनही त्यांच्या लाभापासून वर्जन झालेले दिसून येते. आदिवासी समुदायांच्या सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि शैक्षणिक स्थितीवरील क्सा-क्सा समितीचा अहवाल (२०१४) असे दर्शवितो की अनुसूचित जमातीची ४३ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे, जे सर्वसाधारण लोकसंख्येतील २२ टक्के आहे. भारतीय समाजरचनेत वर्जन, गरिबी, वंचितता आणि सामाजिक बहिष्कार या संकल्पना एकमेकांशी विशीष्ट पद्धतीने जोडलेल्या घेतल्या गेल्या आहेत.

**संदर्भ साहित्याचा आढावा (Review of literature) :**

संदर्भ साहित्य म्हणजे विशिष्ट संशोधन समस्येशी संबंधित लेख, पुस्तके आणि इतर स्रोत शोधणे होय. या संदर्भ साहित्यामध्ये मागील संशोधनाची गणना, वर्णन, सारांश, वस्तुनिष्ठपणे मूल्यांकन आणि स्पष्टीकरण केले आहे. यामुळे संशोधनाला सैद्धांतिक आधार मिळाला असून संशोधकाच्या संशोधनाचे स्वरूप निश्चित करण्यात मदत झाली आहे.

**डी हान अर्जन, (१९९९):** डी हान अर्जन यांनी जानेवारी १९९९ मध्ये "सामाजिक बहिष्कार: वंचिततेच्या सर्वसमावेशक आकलनाकडे", हा शोधनिबंध लिहिला असून या अभ्यासात सामाजिक वंचितता दृष्टिकोन अंतर्भूत आहे. हा शोधनिबंध जागतिक विकास अहवाल २००१ च्या 'समावेशन, न्याय आणि गरिबी निवारण' या विषयावरील कार्यक्रमासाठी तयार करण्यात आला होता, जुने धडे आणि नवीन दिशा' या सत्रात गरिबीची व्याख्या आणि मोजमाप करण्याच्या वैचारिक मुद्द्यांवर आणि वंचितता वादाचे धोरणात्मक संदर्भ आणि 'गरिबी' आणि 'वंचितता' मधील वैचारिक फरक, अनुभवजन्य निर्देशक आणि वंचिततेसाठी धोरणात्मक प्रतिसाद यावर चर्चा करण्यात आली आहे.

हा संशोधन पेपर विद्यापीठात केलेल्या यशस्वी कार्याचा एक परिणाम आहे. यात प्रामुख्याने वैचारिकता, सामाजिक वंचिततेच्या उपयुक्ततेचा विचार करून वंचितता समजून घेण्यासाठीची एक चौकट होती. हा अभ्यास अंशतः उत्तर आणि दक्षिण भागातील वंचिततेची तुलना करण्याच्या संदर्भात केला गेला आहे. अर्जन डी हान यांनी सायमन मॅक्सवेल सोबत काम करून (ज्याचा परिणाम जानेवारी १९९८ IDS बुलेटिनमध्ये झाला) OECD आणि विकसनशील देशांमधील वंचिततेच्या अभ्यासाचे अडथळे पार करण्याच्या प्रयत्नात ही संकल्पना हाती घेतली. अर्जन डी हान यांनी सामाजिक वंचिततेची संकल्पना पूर्णपणे नाविन्यपूर्ण किंवा वंचितांच्या नव्याने उदयास आलेल्या समस्यांचे वर्णन करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे (जसे 'नवीन गरीब') असा तर्क न करता, त्याऐवजी संशोधकाने असा युक्तिवाद केला की या संकल्पनेच्या माध्यमातून वंचिततेच्या दोन केंद्रीय घटकांवर आपले लक्ष केंद्रित करता येईल.

**के.एम. झियाउद्दीन (२००९)** यांनी "दलित आणि सामाजिक वर्जन- संकल्पना समजून घेणे" हा लेख त्याच्या "सामाजिक वर्जनाचे परिमाण": या त्यांनीच लिहीलेल्या पुस्तकामधील आहे. या लेखात ते म्हणतात की, युरोपमध्ये सामाजिक वर्जनाची चर्चा झालेली आहे. या चर्चेत सामान्यपणे सामाजिक वर्जनाचे तीन प्रकार मांडलेले आहेत.

के. एम. झियाउद्दीन यांनी पढील सहा मुद्दे सामाजिक वर्जनाच्या संदर्भात मांडले आहेत.

**१. वस्तू आणि सेवांमधून वगळणे:**

या मुद्द्याद्वारे, लेखकाने गरिबीच्या चिंतेवर लक्ष केंद्रित केले आहे आणि कमी उपभोगपातळी, शिक्षण आणि आरोग्यसेवेच्या संदर्भात वगळण्याचा एक महत्त्वाचा घटक म्हणून याकडे पाहिले गेले

आहे. सार्वजनिक वस्तूंचे स्थान, त्याची प्रवेश योग्यता आणि पैसे देण्याची क्षमता हे काही घटक आहेत ज्यामुळे वगळले जात असते; भूमिहीनता व उपजीविकेच्या संदर्भात ते बरेच खरे आहे असे दिसून येते.

**२. श्रमबाजार बहिष्कार:**

या मुद्द्यातून हे अगदी स्पष्टपणे नोंदवले गेले आहे की, सामाजिक वर्जनाच्या प्रक्रिया श्रमिक बाजारात वावरत असलेल्या यंत्रणेच्या आकलनाद्वारे येत असतात. बहुतेक कुटुंबांसाठी, आणि विशेषतः गरीबांसाठी, मजूरी हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे. हे अगदी खरे आहे की, रोजगार सामाजिक वैधता तसेच उत्पन्नात प्रवेश प्रदान करत असतो.

**३.जमिनीपासून वगळणे:**

अनेक विकसनशील देशांमध्ये जमीन वगळणे ही एक गंभीर समस्या आहे आणि त्याहूनही अधिक, ती गरिबी आणि असुरक्षिततेशी मोठ्या प्रमाणावर संबंधित आहे. जमीन हे केवळ उपजीविकेचे साधन नसून व्यापक अर्थाने सामाजिक एकात्मतेचे साधन आहे यावर लेखकाने भर दिला आहे. हे विकसनशील राष्ट्रांसाठी अधिक संबंधित आहे जेथे जमीन रोजगार आणि उपजीविकेचे प्रमुख स्त्रोत आहे.

**४. सुरक्षेतून वगळणे:**

सुरक्षिततेच्या संकल्पनेला अनेक आयाम आहेत. शारीरिक हिंसाचाराच्या जोखमीपासून सुरक्षितता आणि स्वातंत्र्याच्या दृष्टीने व्यक्तीची भौतिक सुरक्षा प्रथम आहे. दुसरे म्हणजे उपजीविकेची सुरक्षा आणि तिसरे म्हणजे अपघात, आजारी आरोग्य, मृत्यू या आपत्कालीन परिस्थितींपासून संरक्षण. अलिकडच्या वर्षांत UNDP सामाजिक विम्याच्या चौकटीतील घटनांविरूद्ध अधिक जोर देत आहे, ज्यामुळे ते व्यापक होत आहे.

**५. मानवी हक्कांपासून वगळणे:**

मानवी हक्कांची आधुनिकतेनंतरची कल्पना स्वातंत्र्य आणि अधिकारांच्या पूर्वीच्या समजापेक्षा व्यापक आहे. प्रश्न वेगळा असू शकतो की वर्जनाच्या कल्पनेचा मोठा फायदा हा आहे की ते अधिकार आणि कल्याण या दोन्ही गोष्टी एकाच चौकटीत विचारात घेतले जातात. हा पैलू सध्याच्या बदल त्या जागतिक समाजाला प्रासंगिक बनवतो.

**६. वर्जन आणि स्थूल-आर्थिक विकास:**

वर्जनाच्या या विश्लेषणाचा मध्यवर्ती पैलू ही कल्पना आहे की ती समाजाच्या कार्यपद्धतीमध्ये अंतर्भूत आहे. अशाप्रकारे, विकासाच्या मार्गांमधील फरक आणि स्थूल-आर्थिक आणि संरचनात्मक समायोजन धोरणांमध्ये सामाजिक वर्जनाचे समान वैविध्यपूर्ण नमुने सूचित करतात. तत्सम एकूण आर्थिक विकासामुळे उत्पन्न असमानतेचे बरेच वेगळे नमुने, वाढीच्या फायद्यांच्या वितरणाचे बरेच वेगळे नमुने होऊ शकतात. यामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये मध्यस्थी करणाऱ्या संस्थात्मक व्यवस्था महत्त्वाच्या आहेत. ते समाविष्ट करू शकतात किंवा वर्जन करु शकतात, काही क्षेत्रे किंवा गटांपर्यंत नफा मर्यादित करू शकतात किंवा फायदा मोठ्या प्रमाणावर पसरवू शकतात.

**क्झाक्झा व्हर्जीनियस, (२०११):** क्झाक्झा यांनी २०११ साली जमाती आणि सामाजीक वर्जन या लेखात भारतातील आदिवासींचा सविस्तर अभ्यास केल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी सामाजीक वर्जन दृष्टिकोन वापरल्याचे दिसून येते. तसेच या लेखात क्झाक्झा यांनी अनेक विद्वानांनी आदिवासींच्या संदर्भात वापरलेल्या महत्त्वपुर्ण विधानांचा व सांख्यकिय माहितीचा आधार घेतल्याचे दिसून येते. क्झाक्झा यांच्या मते,भारतातील ज्या जमातींची संकल्पना मांडली केली गेली. त्यातील एक महत्त्वपुर्ण वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या प्रमाणात भारतीय समाजापासून भौगोलिक आणि सामाजिक अलगाव होय. याचाच अर्थ ते मोठ्या भारतीय समाजाशी संबंधित होते मात्र त्यांच्या सामाजिक निर्मितीच्या टप्प्याशी संबंधित नव्हते. ते स्पष्ट करतात की, सामाजिक निर्मितीच्या विविध स्तरावर गट/समुदायांची हे वेगवेळ्या श्रेणीमध्ये का विभागले गेले आहे. सर्वांनी एकत्र येउन आदिवासींना जमाती म्हणून परिभाषित केले गेले पाहिजे.

**संशोधन समस्येची निवड: (Selection of Research Problem)**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील "नाशिक जिल्ह्यातील भूमिहीन महादेव कोळी जमातीच्या उपजीविकेचा समाजशास्त्रीय अभ्यास" ही समस्या संशोधन म्हणून निवड केली आहे. यामध्ये सामाजिक वंचिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांची भूमिहीनता व उपजीविका हे प्रमुख मुद्दे घेऊन वरिल संशोधन समस्या संशोधकाने निश्चित केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये (Objectives of the Research) :**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्हयातील आदिवासी भूमिहीन महादेव कोळी असलेल्या प्रमुख तालुक्यातील लोकांचा उपजीविकेच्या संदर्भात आढावा घेणे हा आहे. या मुख्य उद्दिष्टांबरोबरच पुढील काही उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

१) नाशिक जिल्हयातील भूमिहीन महादेव कोळ्यांच्या उपजीविकेचे स्वरुप समजावून घेणे.

२)नाशिक जिल्हयातील भूमिहीन महादेव कोळयांची भूमिहिनता व उपजीविका यांचा परस्पर संबंध समजावून घेणे.

**गृहीतकृत्य (Hypothesis):**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढिल गृहीतकृत्य निश्चित करून संशोधन कार्यास सुरुवात केली आहे. "नाशिक जिल्हयातील आदिवासी महादेव कोळी ही जमात भूमिहीनतेमुळे आपली उपजीविका व विकास या पासून वंचित राहिली आहे".

**संशोधना संबंधीतचा सैद्धांतिक दृष्टिकोन (Theoretical Approach to Research):**

प्रस्तुत संशोधनात सामाजिक वर्जन या दृष्टिकोनाचा वापर करण्यात आला आहे. सामाजिक

वर्जन या दृष्टिकोना संदर्भात सविस्तर माहिती पुढिल प्रमाणे आहे.

**सामाजिक वर्जन (Social Exclusion) :**

सामाजिक वर्जन म्हणजे ज्या मार्गांनी व्यक्ती व्यापक समाजातील पूर्ण सहभागापासून दूर होऊ शकतात. हे अशा घटकांच्या विस्तृत श्रेणीवर लक्ष केंद्रित करते जे व्यक्ती किंवा गटांना बहुसंख्य लोकसंख्येसाठी संधी उपलब्ध होण्यापासून प्रतिबंधित करते. एक पूर्ण आणि सक्रिय जीवन जगण्यासाठी, व्यक्तींनी स्वतःला खाऊ घालणे, कपडे घालणे आणि घर करणे शक्य नाही तर शिक्षण, आरोग्य, वाहतूक, विमा, सामाजिक सुरक्षा, बँकिंग आणि अगदी आवश्यक वस्तू आणि सेवांमध्ये प्रवेश असणे आवश्यक आहे. पोलिस किंवा न्यायव्यवस्थेत प्रवेश. सामाजिक वंचीतता आकस्मिक नसून पद्धतशीर आहे - हे समाजाच्या संरचनात्मक वैशिष्ट्यांचे परिणाम आहे.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की सामाजिक वर्जन अनैच्छिक आहे - म्हणजे, वगळलेल्यांची इच्छा विचारात न घेता वर्जनचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ, श्रीमंत लोक कधीच फुटपाथवर किंवा पुलाखाली झोपलेले आढळत नाहीत जसे शहरे आणि शहरांमधील हजारो बेघर गरीब लोक हे आयुष्य रोज जगतात. याचा अर्थ असा नाही की श्रीमंतांना फुटपाथ आणि पार्क बेंचच्या प्रवेशापासून 'वगळले' जात आहे, कारण त्यांना हवे असल्यास त्यांना नक्कीच असे करू शकतात, परंतु त्यांनी तसे न करणे निवडले आहे. सामाजिक वर्जन कधीकधी त्याच तर्काने चुकीचे न्याय्य आहे - असे म्हटले जाते की वर्जन गट स्वतःच सहभागी होऊ इच्छित नाही. जेव्हा वगळणे इष्ट गोष्टीवर प्रवेश प्रतिबंधित करते तेव्हा अशा युक्तिवादाचे सत्य स्पष्ट नसते (फुटपाथवर झोपण्यासारखे स्पष्टपणे अवांछित गोष्टीपेक्षा वेगळे).

भारतीय समाजावर वसाहतवादाच्या परिणामांबद्दल आपल्याला पहिल्यापासून कल्पना आहे. ब्रिटीश वसाहती राज्याच्या हातून अगदी विशेषाधिकार प्राप्त भारतीयांनाही भेदभाव आणि वर्जन म्हणजे काय? असे अनुभव आले. अर्थातच स्त्रिया, दलित आणि इतर दबलेल्या जाती - जमातींसारख्या विविध सामाजिक भेदभाव करणाऱ्या गटांसाठी सामान्य होते. वसाहतकालीन राजवटीच्या अपमानाला सामोरे जाणे आणि एकाच वेळी लोकशाही आणि न्यायाच्या कल्पनांना सामोरे जाणे, अनेक भारतीयांनी मोठ्या संख्येने सामाजिक सुधारणा चळवळींना सुरुवात केली आणि त्यात भाग घेतला. या संशोधनात संशोधकाने महादेव कोळी या आदिवासी जमातीवर लक्ष केंद्रित करतो जे गंभीर सामाजिक विषमता आणि वर्जनतेने ग्रस्त आहेत.

**संशोधनाचे अभ्यास क्षेत्र (Research Area of The Study):**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भूमिहीन महादेव कोळी लोकांच्या उपजीविकेचा अभ्यास करण्यासाठी प्रथम अभ्यास क्षेत्र निश्चित करुन घेतले. यामध्ये, आदिवासी महादेव कोळी बहुल

तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील भूमिहीन महादेव कोळी असलेल्या दिंडोरी, पेठ या दोन तालुक्यांची निवड केली आहे. नाशिक जिल्ह्यातील या निवड केलेल्या तालुक्यात आदिवासी महादेव कोळी बांधवांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.

**संशोधन अभ्यास पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील अभ्यास पद्धत वापरलेली आहे.

**नमुना निवड (Sample Selection) :**

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना एकक म्हणून संशोधकाने साधी यादृच्छिक आणि सहेतुक अशा दोन्ही पद्धतीने नाशिक जिल्हयातील भुमिहीन (जमीन धारणा नसणारे) महादेव कोळी यांची निवड केलेली आहे. त्यासाठी संशोधकाने नमुना म्हणून ६० उत्तरदात्यांची निवड केली आहे. संबंधीत नमुना हा दिंडोरी, व पेठ या दोन तालुक्यांमधून निवडला गेला आहे, तसेच प्रत्येक तालुक्यातून ०२ गावांची निवड केली गेली आहे.

• **प्रत्येक गावातून भूमिहीन महादेव कोळ्यांच्या याद्या बघुन त्यातून १५ जणांची सहेतूक पध्दतीने निवड केली आहे.**

**माहिती संकलनाचे स्रोत (Sources of Data Collection) :**

संशोधन प्रयत्नांची निर्धारित उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सध्याच्या अभ्यासासाठी माहिती प्राथमिक आणि दुय्यम दोन्ही स्रोतांमधून गोळा केली आहे.

प्राथमिक तथ्य संकलन हे महादेव कोळी कुटुंबांकडून मुलाखत अनुसूची वापरून गोळा केले गेले असून, वैयक्तिक भेटी आणि कंटूंबाच्या प्रमुखांशी चर्चा केली गेली आहे.

**मुलाखत अनुसूची (Interview Schedule) :**

प्रस्तुत सशोधनात मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आलेला आहे. संशाधनासाठी आवश्यक असलेली माहिती उत्तरदात्यांकडून भरुन घतली आहे. कारण आदिवासी जमातीत सुशिक्षिताचे प्रमाण खुपच कमी आणि अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे. म्हणून ही माहिती अधिक योग्य व संशोधनाला योग्य दिशा मिळण्यासाठी अप्रत्यक्ष अनुसूचीचा वापर न करता आदिवासींच्या प्रत्यक्ष घरी जाऊन प्रत्यक्ष भेटून मुलाखत अनुसूची भरुन घेतल्या आहेत.

**दुय्यम माहिती स्रोत (Sources of Secondary Data) :**

प्राथमिक स्रोताव्यतिरिक्त आदिवासी समुदायाची विविध माहिती मिळविण्यासाठी व्दितियक सामग्रीचा देखील आधार घेण्यात आलेला आहे. यामध्ये संशोधनासंबंधित शोध निबंध, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट, लेख, जर्नल्स, जनगणना अहवाल, सरकारी दस्तावेज, जिल्हा राजपत्रे तसेच प्रकाशित व अप्रकाशित साहित्य विचारात घेतलेले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी

वेगवेगळ्या वर्तमानपत्रात आलेले लेख, गॅझेटर्स, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले अहवाल यांचाही उपयोग संशोधनासाठी करण्यात आला आहे. आदिवासीविषयी ज्यांनी काही लहान-मोठे संशोधन केलेले आहे, त्यांचेही प्रकाशित व अप्रकाशित संशोधन प्रबंध संदर्भासाठी उपयुक्त ठरले आहे. इंटरनेटवरुन काही संदर्भिय माहिती घेऊन तिचा देखील उपयोग संशोधनात करण्यात आलेला आहे.

**तथ्य विश्लेषण (Data Analysis):**

प्रस्तुत संशोधनाच्या कालावधीत गोळा केलेली माहिती ज्यामध्ये आदिवासी महादेव कोळी कुटुंबांची सामाजिक-आर्थिक माहिती, उपजीविकेचे स्वरुप, उपजीविकेचे साधने, व्यावसायीक माहिती, आरोग्य आणि पोषण स्थिती, शेतजमिनीविषयी माहिती, शासकिय योजनांचा आदिवासी विकासावर झालेल्या विकासाच्या परिणामांचे प्रमाण, इत्यादी होय.

सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी देखिल SPSS या सॉप्टवेअरचा वापर केला असून वेळप्रसंगी काही ठिकाणी Co-relation, Chi-Square चाचणी घेतली गेली आहे. संशोधकाने निवडलेल्या उद्दिष्टांनुसार तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, क्रॉस टॅब यांसारखी सांख्यिकीय साधने वापरली गेली. आलेख/ तक्ते देखील अभ्यासात वापरले गेले आहे.

**निष्कर्ष:**

१) महादेव कोळी जमातीतील आदिवासींना भूमीहीनतेमुळे कमी उत्पन्न मिळवून देणारी कामे करावी लागतात.

२) नाशिक जिल्हयातील आदिवासी महादेव कोळी ही जमात भूमिहीनतेमुळे आपली उपजीविका व विकास या पासून वंचित राहिलेली आहे.

**संदर्भसूची.**


1. Ghurye G.S. 1972 .The Mahadev Koli. Plance of pub. Pub.
2. John Murray, Albemarle Street 1841Nestorians or, The Lost Tribes
3. Motilal Banarsida 1926. Ancient Indian Tribes
4. Margery Sabin 1987. The Dialect of The Tribe


**मराठी संदर्भ :**


१. एम. एल. वाघमारे २०११. पेसा कायदा १९९६ आणि आदिवासींचा विकास

२. केदार अभिमन्यू १९८६. अकोले तालुक्यातील महादेव कोळी समाजाचा विकास

३. गोविंद गारे २०१३. आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ

४. गोविंद गारे १९७४. सहयाद्रीतील आदिवासी महादेव कोळी